# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## मेट्रो भवन येथे प्रजासत्ताक दिन समारोह संपन्न




नागपूर : महा मेट्रो नवीन कीर्तिमान स्थापित करत पुढे जात असून महा मेट्रोने कमी वेळेत अनेक कार्य पूर्ण केले आहे. महा मेट्रोने नागपूर मेट्रो फ़ेज - १ मध्ये ४० किमीचे नेटवर्क सुरु केले असून आम्हाला विश्वास आहे कि २०२५ मध्ये नागपूर मेट्रो फ़ेज - २ चा काही भाग आम्ही कार्यान्वित करू शकू असे मत महा मेट्रोचे संचालक (रोलींग स्टॉक) श्री. सुनील माथूर यांनी यांनी व्यक्त

केला. ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मेट्रो भवन येथे आयोजित झेंडावंदनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. नागपूर मेट्रोचा ९ वा फाउंडेशन दिवस लवकरच साजरा करणार असून महा मेट्रोच्या यशाने आम्हा सर्वांना गौरवानव्यित झाल्यासारखे वाटते. महा मेट्रोने ५-डी बीम सारख्या टेक्निकलबाबी योग्य पद्धतीने राबवित देशात एक बेंचमार्क स्थापित केला आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाचे ऑपरेशन कार्य सुरु झाल्याने जबाबदारी आणखी वाढली असून रायडरशीप आज ८०-८५ हजार प्रतिदिन आहे. प्रॉपर्टी डेव्हलपमेंट मुळे आज आपण मजबूत होत आहे. अन्य मेट्रो रेल प्रकल्पाच्या तुलनेत आपले खर्च कमी असून नागपूर येथे चांगली सेवा आपण देत आहे. नवी मुंबई येथील सिडको मेट्रो रेल प्रकल्पाला कमर्शियल प्रमाणपत्र मिळाले आहे.

सातत्याने प्रयत्न करत सन्मानजनक रायडरशिप आणि प्रवाश्यांचा विश्वास मिळवला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत या सारख्या कार्यक्रमांमुळे नवीन प्रेरणा मिळते असे देखील ते म्हणाले. लवकरच नवी मुंबई, ठाणे आणि पुणे येथील कार्याकरिता आपणा सर्वांना तयार राहायचे आहे. यावेळी महा मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.